**प्रतीवादीतर्फे साक्षीदार क्र.१ रोजश महादेव ढोके यांचा पूढील सरतपास प्रतीवादीतर्फे वकील श्री. एम.सी. खंगारे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

४. माझे पुराव्याचे शपथपत्र **निशाणी क्र.४२** मध्ये लिहिलेला मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर लिहिण्यात आला असून तो वाचून-समजून मी त्यावर सही केली आहे.

५. मी माझे आजोबा लालजी बापुने ढोके यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर ग्रामपंचायत सिंधेवाणी यांचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ४५** देण्यात येते.

**प्रतीवादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास वादीतर्फे वकील श्रीमती. यु. आर. पवार यांच्यामार्फत**

६. माझे आठवी पर्यंत शिक्षण भोपाल येथे झाले आहे. मला हिंदी लिहिता वाचता येते. मराठी थोडी समजते. इंग्रजी येत नाही. मी ३५ वर्षा पासून भोपाल, मध्यप्रदेश येथे राहत आहे. वादांकित मिळकत टेकाडी, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादांकित मिळकत वडीलोपार्जित आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकतीच्या ७/१२ उता-यावर माझ्या परिवारातील सर्वांचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादांकित मिळकत सामाईक मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा जिवंत असे पर्यंत तेच मिळकतीमध्ये शेती करत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांच्या मृत्यूनंतर माझी आजी, वडील व आत्या मिळकती मध्ये शेती करत होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, फक्त आजी शेती करत होती. माझ्या आजीचे नाव सुंदरबाई लालजी ढोके आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे टेकाडी येथे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते माझ्या आजोबांच्या नावावर होते. त्यांच्या मृत्यूनंतर आजीच्या नावावर झाले. माझ्या वडीलांचा मृत्यू सन २०११ मध्ये झाला. सुंदराबाई यांचा मृत्यू सन २००८ मध्ये झाला. हे म्हणणे खरे आहे की, सुंदराबाई एकटया टेकाडी येथे राहत होत्या व आम्ही सर्व भोपाल येथे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सुंदराबाई यांचा सांभाळ त्यांच्या मुली करत होत्या. माझ्या बहिणीचे लग्न कोणत्या वर्षी झाले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नमुद केले आहे की, माझ्या आजीने मृत्यूपत्र बनवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र

बनवले त्यावेळेस माझी आजी कोराडी येथे होती व आजारी होती. मी दावा दाखल करतांना मृत्यूपत्र दाखल केले नाही कारण त्यावेळी आठवले नाही व आता आठवले. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले मृत्यूपत्र खोटे आहे व सुंदराबाई यांनी असे कोणतेही मृत्यूपत्र बनवले नव्हते. टेकाडी येथील घर माझ्या आईने विकले. हे म्हणणे खरे आहे की, टेकाडी येथील घर सुंदराबाईच्या मृत्यूनंतर विकले. हे म्हणणे खरे आहे की, घर विकण्यापूर्वी इतर वारसांची संमती घेतली नाही. सदर घर व वादांकित मिळकतमध्ये माझ्या वडीलांइतकाच इतर वारसांचा देखील हिस्सा आहे याबाबत मला माहित नाही. मला चार आत्या आहेत. त्यातील बेबीबाई, परवताबाई व पार्वतीबाई जिवंत आहेत. वच्छलाबाई मयत आहे. वच्छलाबाई यांचे वारस ७/१२ वर घेतले आहे की कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादांकित मिळकतीमध्ये सर्व वारसांचा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेला प्रतीदावा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुंदराबाई यांनी त्यांच्या मृत्यूपूर्वी कोणतेही दस्त बनवले नाही. वादांकित मिळकतीमध्ये फक्त ५ हिस्से बनतात की कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्यातील शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ मध्ये पान क्र. ३ मध्ये 'त्यामुळे सुंदराबाई यांनी करून दिलेल्या मृत्यू पत्राच्या आधारे आम्ही वादी सुंदराबाईचे व १/६ हिस्स्याचे मालक झालो' हे लिहिलेले खोटे आहे.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, मी शेत ठेक्याने देतो. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे जे पण पैसे येतात ते मी माझ्याकडे ठेवतो. हे म्हणणे खरे आहे की, वादीला मी त्यातील एकही पैसा दिला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ते पैसे मम्मी ठेवते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आत्या मला सदरचे पैसे मागण्यास आली असता मी नकार दिला. मी शेतीचे काम पाहत नाही, माझी आई पाहते. ७/१२ उता-यावर सर्वांचे नाव असूनही वाटणी केली नाही कारण कोणीही वाटणीकरून मागितली नाही. वाटणी मागितली असती तर मी हिस्सा दिला असता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा वाटणीकरिता आहे. महादेव यांचा जेवढा हिस्सा आहे तेवढा आम्हा चौघांना भेटणार आहे की कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा प्रतीदावा दाखल केला आहे.

८. माझ्या शेतात विहिर नाही. सदर दाव्यामध्ये महादेवच्या वारसां व्यतिरिक्त इतर प्रतिवादींनी संयुक्त पुरसीस दाखल करून हिस्स्याची मागणी केली की कसे हे मला माहित नाही.

**९.** बेबीबाई यांना कॅन्सर हा आजार आहे की कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, बेबीबाई व सुंदराबाई मिळून शेती करत होत्या परंतु माझ्या वडीलांच्या मृत्यूनंतर बेबीबाई यांना शेती करण्यापासून काढून टाकले. बेबीबाई यांनी मला हिस्सा मागितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी १/५ हिस्सा देण्यास नकार दिल्याने सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, संयुक्त वादांकित मिळकत हडपन्याकरिता मी खोटा प्रतीदावा दाखल केला आहे.

**१०.** आदम चुडामन पानतावने माझे जीजाजी आहे. जनार्धन सदाशिव नारनवरे हे माझे मामा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या सोबत माझे चांगले संबंध आहे. माझ्या वडीलांनी एक संमत्ती पत्र लिहून घेतले होते की कसे हे मला माहित नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

SONPARI MAHENDRA GADE

Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2025.07.24 17:35:59 +0530

दिनांक – २४.०७.२०२५.

सावनेर.

(एस. एम. गाडे)

३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर,

सावनेर, जि. नागपूर.

नि.दि.ख.क्र.-५४/२०२२
बेबी वि पदमाबाई
<u>निशाणी क्र. ४२ च्या पुढे</u>

नि.दि.ख.क्र.-५४/२०२२
बेबी वि पदमाबाई
निशाणी क्र. ४२ च्या पुढे

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe